जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ०५.१२.२०२५**

''भिवंडी येथे गावठी दारूचा साठा हस्तगत''

दिनांक ०४/१२/२०२५ रोजी गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी चे पोहवा/५५३४ किशोर थोरात यांना मिळालेल्या गोपनीय बातमीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/श्री.जनार्दन सोनवणे यांनी कारवाई करण्याबाबत सुचना दिल्या. त्याअनुषंगाने पोउपनि/रामचंद्र जाधव व त्यांचे पथकाने आरोपी रूपेश नारायण पाटील, वय ३५ वर्षे, रा.आलिमघर, भिवंडी याचे राहते घराचे शेजारी खोलीमध्ये छापा कारवाई केली असता त्यात एकुण १,११,५००/- रुपये किंमतीची १,११५ लिटर हातभट्टीची तयार दारू असा मुद्येमाल हस्तगत केला आहे. सदरबाबत आरोपीविरूद्ध नारपोली पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. । १३०७/२०२५, दारूबंदी अधिनियम १९४९ चे कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई ही श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री.शेखर बागडे, सहा. पोलीस आयुक्त, शोध-१, गुन्हे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, घटक-२, भिवंडी चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक/जनार्दन सोनवणे, सपोनि/मिथुन भोईर, पोउनि/रामचंद्र जाधव, पोउनि/रविंद्र बी. पाटील, पोहवा/५५३४ किशोर थोरात, पोहवा/४५४६ प्रकाश पाटील, पोहवा/१३५४ शशिकांत यादव, पोहवा/४४९० निलेश बोरसे व पोअं/६२८३ सर्फराज तडवी यांनी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर